M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai
Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महत्त्वाचे

क्र.मुंविमं/शाखा एन/ ४६१६
नवी मुंबई - ४०० ७०३
दिनांक - २०/११/२०२५
21

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त शाळांचे मुख्याध्यापक,
तसेच कनिष्ठ महाविद्यालय यांचे प्राचार्य,
जिल्हा मुंबई/ठाणे/पालघर/रायगड

विषय - माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचे व्दितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र, तात्पुरते प्रमाणपत्र व स्थलांतर प्रमाणपत्र RFP प्रक्रीयेद्वारे ऑनलाईन प्रणालीमधून देणेबाबत..

संदर्भ - क्र.रा.मं/परीक्षा -३ /४००२ दि. १९/११/२०२५ चे पत्र

मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई या विभागातील सर्व मान्यताप्राप्त शाळांचे मुख्याध्यापक तसेच कनिष्ठ महाविद्यालय यांचे प्राचार्य यांना उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की,

१) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचे व्दितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र (Duplicate Marksheet / Certificate), तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) व स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) साठी दिनांक १९/११/२०२५ पासून मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने आपल्या स्तरावरुन विद्यार्थ्यास अर्ज करण्याबाबत अवगत करावे.

२) व्दितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र (Duplicate Marksheet / Certificate), तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) व स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) यासाठी प्रती प्रमाणपत्र रु.५००/- (रुपये पाचशे फक्त) शुल्क आकारण्यात येईल.

३) माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय तसेच विद्यार्थ्यांना यासाठी आधारकार्ड OTP Based च्या आधारे व्दितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र (Duplicate Marksheet / Certificate), तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) व स्थलांतर प्रमाणपत्रासाठी (Migration Certificate) अर्ज करता येईल.

४) सद्यस्थितीत १९९० सालापासून e- marksheet प्रणालीमध्ये विद्यार्थ्यांचा सर्व data उपलब्ध आहे. त्यामुळे १९९० नंतरचे duplicate गुणपत्रक / प्रमाणपत्राची मागणी आल्यास त्याची Soft Copy अर्जदारास उपलब्ध होईल.

Telephone : 27652445,27662504,27881077,27881075,27899987 * Fax : 27659491/27881349
Email : certificate.mumbaiboard@gmail.com * Website : www.sscboardmumbai.in

कु.मा.प.

M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai
Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.

५) प्रमाणपत्राची मागणी पोस्टाने केल्यास ते Speed Post ने पाठविण्यात येतील.

६) प्रचलित पद्धतीमध्ये माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी दिलेले शिफारस पत्र घेण्यात येत होते तथापि नवीन Online प्रणालीमध्ये माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिफारस पत्राची आवश्यकता नाही. तसेच प्रचलित पद्धतीमध्ये व्दितीय प्रमाणपत्रावर माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का व मुख्याध्यापक / प्राचार्य यांची स्वाक्षरी घेण्यात येत होती तथापि यापुढे Online प्रणालीमध्ये व्दितीय प्रमाणपत्रावर माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का, मुख्याध्यापक / प्राचार्य यांची स्वाक्षरी घेण्याची आवश्यकता नाही.

७) ऑनलाईन प्रणालीत एकदा भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

(ज्योत्स्ना शिंदे पवार)
विभागीय सचिव (प्र.)
महाराष्ट्र राज्य माध्य व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी ,नवी मुंबई - ४०० ७०३

Telephone : 27652445,27662504,27881077,27881075,27899987 * Fax : 27659491/27881349
Email : certificate.mumbaiboard@gmail.com * Website : www.sscboardmumbai.in